# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

## **अर्थशास्त्र विभाग**



पुढारी | पुणे, शनिवार १३ जानेवारी २०१८

### भारतीय कृषी वित्तपुरवठ्याच्या रचनेवर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने सोमवार (दि. १५) व मंगळवार (दि. १६) रोजी भारतीय कृषी वित्त पुरवठ्याची रचना या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी दिली.

चर्चासत्राच्या निमित्ताने राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अरविंद शाळिग्राम, मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विजय खरे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, मध्यप्रदेशच्या राणी दुर्गावती विद्यापीठ जबलपूरचे डॉ. एन. जी. पेंढसे आदी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती चर्चासत्राचे समन्वयक डॉ. टी. जी. गिते यांनी दिली आहे.

लोकमत पुणे, शनिवार, दि. १३ जानेवारी २०१८

## वित्तपुरवठ्याच्या रचनेवर राष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने दि. १५ व १६ जानेवारी रोजी 'भारतीय कृषी वित्तपुरवठ्याची रचना' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी दिली.

राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्या हस्ते, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अरविंद शाळिग्राम, मानव विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विजय खरे यांच्या उपस्थितीत आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्राचे उद्घाटन होणार आहे. मध्य प्रदेशातील राणी दुर्गावती विद्यापीठ, जबलपूरचे डॉ. एन. जी. पेंडसे 'कृषी कर्जाचे स्वरूप' या विषयावर बीजभाषण करणार आहेत. डॉ. मकरंद चिकोडीकर (गोवा), डॉ. अनुपमा सुरेश, डॉ. व्ही. पी. राघवन, डॉ. रेखा गावकर, डॉ. अनिलकुमार ठाकूर, विजयकुमार अदावंत, विक्रांत मुदलीयार हे तज्ञ या चर्चासत्रात मार्गदर्शन करतील.

सकाळ
पुणे, रविवार
१४ जानेवारी २०१८

## राजगुरू महाविद्यालयात उद्यापासून चर्चासत्र

राजगुरुनगर, ता. १३ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने १५ व १६ जानेवारी रोजी 'भारतीय कृषी वित्त पुरवठ्याची रचना' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आल्याची माहिती प्राचार्य एस. बी. पाटील यांनी दिली.

चर्चासत्राचे उद्घाटन राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्या हस्ते व विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अरविंद शाळिग्राम, मानवविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विजय खरे यांच्या उपस्थितीत होणार आहे. संस्थेचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील अध्यक्षस्थानी असतील. जबलपूरच्या राणी दुर्गावती विद्यापीठाचे डॉ. एन. जी. पेंडसे 'कृषी कर्जाचे स्वरूप' या विषयावर बीजभाषण देणार आहेत. डॉ. मकरंद चिकोडीकर (गोवा), डॉ. अनुपमा सुरेश (भोपाळ), डॉ. व्ही. पी. राघवन (केरळ), डॉ. रेखा गावकर, डॉ. अनिलकुमार ठाकूर (नवी दिल्ली), विजयकुमार अदावंत (हैदराबाद), विक्रांत मुदलीयार (गोवा), हे तज्ञ या चर्चासत्रात मार्गदर्शन करणार आहेत. समारोप समारंभ नवी दिल्ली येथील भारत सरकारच्या 'चोएसएसआर'चे संचालक डॉ. संतोष दास्ताने यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

केसरी पुणे, १६ जानेवारी २०१८

## राजगुरु महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्रास प्रारंभ

राजगुरुनगर, (वार्ताहर) : गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने दि. १५ व १६ जानेवारी रोजी आयोजित 'भारतीय कृषी वित्त पुरवठ्याची रचना' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रास प्रारंभ झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी दिली.

चर्चासत्राचे उद्घाटन राज्याचे उच्चशिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्या हस्ते, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अरविंद शालिग्राम, मानवविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विजय खरे यांच्या उपस्थितीत आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

दरम्यान चर्चासत्रात मध्यप्रदेशच्या राणी दुर्गावती विद्यापीठ जबलपूरचे डॉ. एन. जी. पेंडसे 'कृषी कर्जाचे स्वरूप' या विषयावर बीजभाषण देणार आहेत. तसेच डॉ. मकरंद चिकोडीकर (गोवा), डॉ. अनुपमा सुरेश (भोपाळ), डॉ. व्ही. पी. राघवन (केरळ), डॉ. रेखा गावकर, डॉ. अनिलकुमार ठाकुर (नवी दिल्ली), विजयकुमार अदावंत (हैद्राबाद), विक्रांत मुदलीयार (गोवा) हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

4G Idea 9:38

epaper.esakal.com/FlashC 1

# कृषीचा वित्तपुरवठा वाढविण्याची गरज

## ॲड. बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन; राजगुरुनगरला राष्ट्रीय चर्चासत्र




**राजगुरुनगर (ता. खेड) : राष्ट्रीय चर्चासत्रादरम्यान संशोधक प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या शोधनिबंधांच्या 'अर्थपर्व' या स्मरणिकेचे प्रकाशन करताना मान्यवर.**

**राजगुरुनगर, ता. १६ :** "कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधल्याशिवाय आर्थिक विकासाची गती कायम राखणे अशक्य आहे. या क्षेत्राच्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी सरकारने कृषी व कृषी संलग्न क्षेत्रात वित्तपुरवठा वाढविण्याची गरज आहे," असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित कृषी वित्तपुरवठ्याची रचना या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‍घाटन प्रसंगी ते बोलत होते.

बुट्टे पाटील म्हणाले, "शेतकऱ्यांना कर्ज देणे एवढीच सरकारची जबाबदारी नसून शेतीमालास हमीभाव देणेही गरजेचे आहे. फायद्या तोट्याचा विचार न करता शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायला हवेत."

डॉ. मकरंद चिकोडीकर म्हणाले, "शेतकऱ्यांना कर्जातून बाहेर काढल्याशिवाय त्यांच्या आत्महत्या थांबणार नाही. बँकांनी मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केल्यास सावकारी कर्जातून त्यांची सुटका होईल."

दोनदिवसीय चर्चासत्रात डॉ. वैदेही दप्तरदार (ठाणे) यांनी संस्थात्मक कृषी पतपुरवठ्याचे पुनरुज्जीवन, डॉ. एन. जी. पेंडसे (जबलपूर) यांनी ग्रामीण वित्त पुरवठ्यात होणारे बदल व संभाव्य परिणाम, डॉ. अनुपमा राऊत (भोपाळ) यांनी महिला बचत गटाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेतील सहभाग आणि रोजगारनिर्मिती, डॉ. विजयकुमार अदावंत (हैदराबाद) यांनी राष्ट्रीयीकृत बँकांकडून कृषीपेक्षा उद्योगांना वित्तपुरवठा करण्याकडे वाढलेला कल, डॉ. अनिल ठाकूर (दिल्ली) यांनी कृषी वित्त पुरवठ्याचे विविध स्रोत, प्राचार्या डॉ. गिरिजा शंकर (पुणे) यांनी कृषी-औद्योगिक वित्तपुरवठ्याचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर विवेचन केले.

चर्चासत्राचा समारोप डॉ. संतोष दास्ताने (दिल्ली) यांच्या कृषी अर्थव्यवस्थेतील बदलते प्रवाह या विषयावरील भाषणाने झाला. नानासाहेब टाकळकर यांनी शेतीची नेमकी समस्या लक्षात घेऊन पतपुरवठ्याचा विचार करायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या वेळी संशोधक प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या शोधनिबंधांच्या 'अर्थपर्व' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. चर्चासत्राचे आयोजन समन्वयक प्रा. डॉ. टी. जी. गीते, डॉ. ए. एम. पवार, डॉ. आर. एस. शिरसी, प्रा. एस. व्ही. धानापुरे, प्रा. एस. एस. घोंगडे यांनी केले. डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, शीतल भोर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ए. एम. पवार यांनी आभार मानले.

लोकमत

# कृषिक्षेत्रात वित्तपुरवठा वाढविण्याची गरज

## देवेंद्र बुट्टे-पाटील : कृषी वित्तपुरवठ्याची रचना विषयावर चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** ग्रामीण अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेतीक्षेत्रावर अवलंबून असल्याने प्रगत तंत्रज्ञान, बारमाही जलसिंचनाची सोय, कर्जपुरवठा आणि लागणाऱ्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी सरकारने कृषी व कृषिसंलग्न क्षेत्रांत वित्तपुरवठा वाढविण्याची आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित भारतीय कृषी वित्त पुरवठ्याची रचना या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते.

या वेळी डॉ. मकरंद चिकोडीकर (गोवा), डॉ. वैदेही दप्तरदार (ठाणे), संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, माणिक पाटोळे, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच.एम. जरे, प्रा. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, समन्वयक डॉ.टी.जी. गिते, विद्यापीठ प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर आणि देशभरातून १६७ संशोधक-प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

दोन दिवसीय चर्चासत्रात डॉ. वैदेही दप्तरदार (ठाणे) यांनी संस्थात्मक कृषी पतपुरवठ्याचे पुनरुज्जीवन, डॉ. एन.जी. पेंडसे (जबलपूर) यांनी ग्रामीण वित्त पुरवठ्यात होणारे बदल व संभाव्य परिणाम, डॉ. अनुपमा राऊत (भोपाळ) यांनी महिला बचत गटाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेतील सहभाग आणि रोजगारनिर्मिती, डॉ. विजयकुमार अदावंत (हैदराबाद) यांनी राष्ट्रीयीकृत बँकांकडून कृषीपेक्षा उद्योगांना वित्तपुरवठा करण्याकडे वाढलेला कल, डॉ. अनिल ठाकूर (दिल्ली) यांनी कृषी वित्त पुरवठ्याचे विविध स्रोत, प्राचार्या डॉ. गिरिजा शंकर (पुणे) यांनी कृषी-औद्योगिक वित्तपुरवठ्याचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर विवेचन केले.

चर्चासत्राचा समारोप डॉ. संतोष दास्ताने (दिल्ली), संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या उपस्थितीत झाला. डॉ. दास्ताने यांनी कृषी अर्थव्यवस्थेतील बदलते प्रवाह या विषयावर मनोगत व्यक्त केले. नानासाहेब टाकळकर यांनी शेतीची नेमकी समस्या लक्षात घेऊन पतपुरवठ्याचा विचार करायला हवा, असे मत व्यक्त केले.

या वेळी संशोधक प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या शोधनिबंधांच्या (अर्थपर्व) स्मरणिकेचे (प्रोसेडिंग) प्रकाशन करण्यात आले. या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन समन्वयक प्रा. डॉ. टी.जी. गिते, डॉ.ए.एम. पवार, डॉ.आर.एस. शिरसी, प्रा. एस.व्ही. धानापुरे, प्रा. एस.एस. घोंगडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस.बी. पाटील यांनी, सूत्रसंचालन प्रा. श्वेतांबरी आल्हाट, शीतल भोर यांनी, तर आभार डॉ.ए.एम. पवार यांनी मानले.




राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शोधनिबंधांच्या 'अर्थपर्व' या स्मरणिकेचे (प्रोसेडिंग) मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

> “ कृषिक्षेत्राचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय आर्थिक विकासाची गती कायम राखणे अशक्य आहे. कृषिक्षेत्रात अपेक्षित वाढ झाली तरच गरिबी आणि बेरोजगारीची समस्या सुटून भारतीय अर्थव्यवस्था विकसित होईल. शेतकऱ्यांना कर्ज देणे एवढीच सरकारची जबाबदारी नसून, त्यांच्या मालाला हमीभाव देताना शासनाने फायद्या-तोट्याचा विचार न करता शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायला हवेत.
>
> **- अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील**

> “ शेतकऱ्यांना कर्जातून बाहेर काढल्याशिवाय त्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. बँकांनी मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा केल्यास शेतकऱ्यांची सावकारी कर्जातून सुटका होईल. त्यासाठी ग्रामीण भागात बँकांचे जाळे विस्तारण्याची गरज आहे.
>
> **- डॉ. मकरंद चिकोडीकर**

Hello Pune Gramin
Page No. 5 Jan 17, 2018
Powered by: erelego.com

★★पुणे, बुधवार, १७ जानेवारी २०१८ । किंमत ₹ ४

# सकाळ

हूज हू

**वीरेंद्र सेहवाग**

कसोटी क्रिकेट सामन्यात त्रिशतक झळकविणारा पहिला भारतीय खेळाडू. त्याने २८ मार्च २००४ रोजी मुलतान येथे पाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात ३०९ धावा केल्या होत्या. त्याच्या नावावर १०४ कसोटी सामने (२३ शतके व ३२ अर्धशतके) व २५१ एकदिवसीय सामने (१५ शतके व ३८ अर्धशतके) आहेत.

सकाळ
पुणे, बुधवार
१७ जानेवारी २०१८
3

# कृषीचा वित्तपुरवठा वाढविण्याची गरज

## ॲड. बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन; राजगुरुनगरला राष्ट्रीय चर्चासत्र



राजगुरुनगर (ता. खेड) : राष्ट्रीय चर्चासत्रादरम्यान संशोधक प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या शोधनिबंधांच्या 'अर्थवर्त' या स्मरणिकेचे प्रकाशन करताना मान्यवर.

राजगुरुनगर, ता. १६ : "कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधल्याशिवाय आर्थिक विकासाची गती कायम राखणे अशक्य आहे. या क्षेत्राच्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी सरकारने कृषी व कृषी संलग्न क्षेत्रात वित्तपुरवठा वाढविण्याची गरज आहे," असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित 'कृषी वित्तपुरवठ्याची रचना' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

बुट्टे पाटील म्हणाले, "शेतकऱ्यांना कर्ज देणे एवढीच सरकारची जबाबदारी नसून शेतीमालाला हमीभाव देणेही गरजेचे आहे. परताव्या तोट्याचा विचार न करता शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावयास हवेत."

डॉ. मकरंद पिंगोडीकर म्हणाले, "शेतकऱ्यांना कर्जातून बाहेर काढल्याशिवाय त्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. बँकांनी मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केल्यास सावकारी कर्जातून त्यांची सुटका होईल."

दोनदिवसीय चर्चासत्रात डॉ. वैदेही दफ्तरदार (ठाणे) यांनी संस्थात्मक कृषी पतपुरवठ्याचे पुनरावलोकन, डॉ. एस. जी. रिठे (जयपूर) यांनी ग्रामीण वित्त पुरवठ्यात होणारे बदल व संभाव्य परिणाम, डॉ. अनुपमा राऊत (भोपाळ) यांनी महिला बचत गटाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्व आणि रोजगारनिर्मिती, डॉ. विजयकुमार अदावंत (हैदराबाद) यांनी राष्ट्रीयीकृत बँकांकडून कृषिक्षेत्र उद्योगांना वित्तपुरवठा करण्याकडे वाढलेला कल, डॉ. अनिल ठाकूर (दिल्ली) यांनी कृषी वित्त पुरवठ्याचे विविध स्रोत, प्राचार्य डॉ. गिरिजा शंकर (पुणे) यांनी कृषी-औद्योगिक वित्तपुरवठ्याचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर विवेचन केले.

चर्चासत्राचा समारोप डॉ. संतोष दास्ताने (दिल्ली) यांच्या कृषी अर्थव्यवस्थेतील बदलते प्रवाह या विषयावरील भाषणाने झाला. नानासाहेब टाकळकर यांनी शेतीची नेमकी समस्या लक्षात घेऊन पतपुरवठ्याचा विचार करायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या वेळी संशोधक प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या शोधनिबंधांच्या 'अर्थवेध' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. चर्चासत्राचे आयोजन समन्वयक प्रा. डॉ. टी. जी. गीते, डॉ. ए. एम. पवार, डॉ. आर. एस. शिरसी, प्रा. एस. व्ही. धायगुडे, प्रा. एस. एस. घोरपडे यांनी केले. डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, शीतल भोर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ए. एम. पवार यांनी आभार मानले.

पुणे, बुधवार
१७ जानेवारी २०१८

# कृषीचा वित्तपुरवठा वाढविण्याची गरज

## अॅड. बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन; राजगुरुनगरला राष्ट्रीय चर्चासत्र



राजगुरुनगर (ता. खेड) : राष्ट्रीय चर्चासत्रादरम्यान संशोधक प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या शोधनिबंधांच्या 'अर्थपर्व' या स्मरणिकेचे प्रकाशन करताना मान्यवर.

राजगुरुनगर, ता. १६ : "कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधल्याशिवाय आर्थिक विकासाची गती कायम राखणे अशक्य आहे. या क्षेत्राच्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी सरकारने कृषी व कृषी संलग्न क्षेत्रात वित्तपुरवठा वाढविण्याची गरज आहे," असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित कृषी वित्तपुरवठ्याची रचना या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

बुट्टे पाटील म्हणाले, "शेतकऱ्यांना कर्ज देणे एवढीच सरकारची जबाबदारी नसून शेतीमालास हमीभाव देणेही गरजेचे आहे. फायद्या तोट्याचा विचार न करता शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायला हवेत."

डॉ. मकरंद खिरोडीकर म्हणाले, "शेतकऱ्यांना कर्जातून बाहेर काढल्याशिवाय त्यांच्या आत्महत्या थांबणार नाही. बँकांनी मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केल्यास सावकारी कर्जातून त्यांची सुटका होईल."

दोनदिवसीय चर्चासत्रात डॉ. वैदेही दासदार (ठाणे) यांनी संस्थात्मक कृषी पतपुरवठ्याचे पुनर्वलोकन, डॉ. एस. जी. पेडके (जळगाव) यांनी ग्रामीण वित्त पुरवठ्यात होणारे बदल व संभाव्य परिणाम, डॉ. अनुपमा राऊत (भोपाळ) यांनी महिला बचत गटाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेतील सहभाग आणि रोजगारनिर्मिती, डॉ. विजयकुमार अदावंत (हैदराबाद) यांनी राष्ट्रीयीकृत बँकांकडून कृषिपिक उद्योगांना वित्तपुरवठा करण्याकडे वाढलेला कल, डॉ. अनिल ठाकूर (दिल्ली) यांनी कृषी वित्त पुरवठ्याचे विविध स्रोत, प्राचार्य डॉ. गिरिजा शंकर (पुणे) यांनी कृषी-औद्योगिक वित्तपुरवठ्याचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर विवेचन केले.

चर्चासत्राचा समारोप डॉ. संतोष दास्ताने (दिल्ली) यांच्या कृषी अर्थव्यवस्थेतील बदलते प्रवाह या विषयावरील भाषणाने झाला. नानासाहेब टाकळकर यांनी शेतीची जैविक समस्या लक्षात घेऊन पतपुरवठ्याचा विचार करायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या वेळी संशोधक प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या शोधनिबंधांच्या 'अर्थपर्व' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. चर्चासत्राचे आयोजन समन्वयक प्रा. डॉ. टी. जी. गीते, डॉ. ए. एस. पवार, डॉ. आर. एस. शिरसी, प्रा. एस. व्ही. धानपुरे, प्रा. एस. एम. घोलपे यांनी केले. डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक, प्रा. ज्योत्स्ना आल्हाट, शीतल घोर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ए. एस. पवार यांनी आभार मानले.

लोकमत पुणे, बुधवार, दि. १७ जानेवारी २०१८ ५

# कृषिक्षेत्रात वित्तपुरवठा वाढविण्याची गरज

## देवेंद्र बुट्टे-पाटील : कृषी वित्तपुरवठ्याची रचना विषयावर चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

[illegible]




[illegible]

"[illegible]"

– ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील

"[illegible]"

– डॉ. मकरंद खिकोलीकर

[illegible]

१९ ते २५ जानेवारी २०१८

**खेड टाइम्स**

# 'कृषीक्षेत्रात वित्तपुरवठा वाढविण्याची गरज'

**राजगुरुनगर, (प्रतिनिधी)** - ग्रामीण अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेतीक्षेत्रावर अवलंबून असल्याने प्रगत तंत्रज्ञान, बारमाही जलसिंचनाची सोय, कर्जपुरवठा आणि लागणाऱ्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी सरकारने कृषी व कृषीसंलग्न क्षेत्रात वित्त पुरवठा वाढविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित भारतीय कृषी वित्त पुरवठ्याची रचना या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

या वेळी डॉ. मकरंद चिकोडीकर (गोवा), डॉ. वैदेही दफ्तरदार (ठाणे), संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, माणिक पाटोळे, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, समन्वयक डॉ. टी. जी. गिते, विद्यापीठ प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर आणि देशभरातून १६७ संशोधक-प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले की, कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधल्याशिवाय आर्थिक विकासाची गती कायम राखणे अशक्य आहे. कृषी क्षेत्रात अपेक्षित वाढ झाली तरच गरिबी आणि बेरोजगारीची समस्या सुटून भारतीय अर्थव्यवस्था विकसित होईल. शेतकऱ्यांच्या त्यांच्या मालाला हमीभाव देताना शासनाने फायदातोट्याचा विचार न करता शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायला हवे, असे सांगितले.

डॉ. मकरंद चिकोडीकर यांनी शेतकऱ्यांना कर्जातून बाहेर काढल्याशिवाय त्यांच्या आत्महत्या थांबणार नाही, असे सांगून बँकांनी मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा केल्यास सावकारी कर्जातून त्यांची सुटका होईल. त्यासाठी ग्रामीण भागात बँकांचे जाळे विस्तारण्याची गरज असून, शेतकऱ्यांना बँकेच्या माध्यमातून कर्जपुरवठा नियमित झाला तरच त्यांच्या समस्या सुटतील असे सांगितले.

दोन दिवसीय चर्चासत्रात डॉ. वैदेही दफ्तरदार (ठाणे) यांनी संस्थात्मक कृषी पतपुरवठ्याचे पुनरुज्जीवन, डॉ. एन. जी. पेंडसे (जबलपूर) यांनी ग्रामीण वित्त पुरवठ्यात होणारे बदल व संभाव्य परिणाम, डॉ. अनुपमा राऊत (भोपाळ) यांनी महिला बचतगटाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेतील सहभाग आणि रोजगारनिर्मिती, डॉ. विजयकुमार अदावंत (हैद्राबाद) यांनी राष्ट्रीयकृत बँकांकडून कृषिपेक्षा उद्योगांना वित्तपुरवठा करण्याकडे वाढलेला कल, डॉ. अनिल ठाकूर (दिल्ली) यांनी कृषी वित्त पुरवठ्याचे विविध स्रोत, प्राचार्या डॉ. गिरिजा शंकर (पुणे) यांनी कृषी-औद्योगिक वित्तपुरवठ्याचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर विवेचन केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख